International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 15 January – February - 2026

# नाशिक जिल्ह्याच्या कृषी विकासात नाबार्डमार्फत करण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याचा अभ्यास

**प्रा. दिलीप पवार[१], डॉ. अशोक ससाने[२]**

*[१]संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे*

*[२]विभाग प्रमुख, अण्णासाहेब मगर महाविद्यालय हडपसर*

*Corresponding Author – प्रा. दिलीप पवार*

**DOI - 10.5281/zenodo.18863708**

**सारांश:**

*पुणे जिल्हा महाराष्ट्र राज्यातील एक महत्त्वाचा औद्योगिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक केंद्रबिंदू आहे. स्वातंत्र्यानंतर आणि विशेषतः १९६० नंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून या भागात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण घडले. पिंपरी-चिंचवड, तळेगाव, चाकण, भोसरी यांसारख्या औद्योगिक पट्ट्यांनी जिल्ह्याचे चित्र बदलले. या औद्योगिकीकरणामुळे रोजगार निर्मिती, शहरीकरण, उत्पन्नवाढ, शिक्षणाच्या संधी, महिलांचे सबलीकरण यांसारखे सकारात्मक बदल झाले, तर दुसरीकडे प्रदूषण, झोपडपट्ट्यांची वाढ, सामाजिक विषमता, पारंपरिक व्यवसायांचा ऱ्हास अशा नकारात्मक बाबीही पुढे आल्या. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश औद्योगिकीकरणामुळे पुणे जिल्ह्यात झालेल्या आर्थिक व सामाजिक विकासाचा चिकित्सक अभ्यास करणे हा आहे. या अभ्यासात ऐतिहासिक पार्श्वभूमी, औद्योगिकीकरणाची प्रक्रिया, आर्थिक व सामाजिक बदलांचे विविध पैलू, त्यांचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम, तसेच भविष्यासाठी काही शिफारसी मांडण्यात आल्या आहेत.*

***बीजशब्द: : औद्योगिकीकरण, पुणे जिल्हा, आर्थिक विकास, सामाजिक बदल, शहरीकरण, रोजगार, पर्यावरण.***

**प्रस्तावना (Introduction):**

पुणे जिल्हा ऐतिहासिकदृष्ट्या शिक्षण, संस्कृती, राजकारण आणि सामाजिक चळवळींसाठी प्रसिद्ध आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात येथे प्रामुख्याने शिक्षणसंस्था, हस्तकला व लहान प्रमाणातील उद्योग आढळत होते . परंतु स्वातंत्र्यानंतरच्या औद्योगिक धोरणांमुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांत उद्योगधंद्यांची वाढ झाली आणि पुणे जिल्हा त्यातील एक आघाडीचा जिल्हा ठरला.

१९६० च्या दशकात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) पिंपरी-चिंचवड, भोसरी, हिंजवडी, खराडी, तळेगाव, चाकण, रांजणगाव ,सणसवाडी , शिक्रापूर ,कुरकुंभ , बारामती,राजगुरुनगर या भागांत औद्योगिक वसाहती निर्माण केल्या. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर देशी-विदेशी कंपन्या येथे स्थायिक झाल्या. टाटा मोटर्स, बजाज ऑटो, थर्मॅक्स, व्हर्लपूल, मर्सिडीज-बेंझ, जनरल मोटर्स एलजी इलेक्ट्रॉनिक्स जॉन डीअर यांसारख्या उद्योगांनी जिल्ह्याला औद्योगिक नकाशावर अग्रस्थानी आणले. औद्योगिकीकरणामुळे पुण्यात रोजगारनिर्मिती वाढली, शिक्षणाचा दर्जा उंचावला, महिलांना रोजगारसंधी मिळाल्या आणि शहरीकरण वेगाने झाले. परंतु त्याच वेळी झोपडपट्ट्या, प्रदूषण, वाहतूक कोंडी, सामाजिक विषमता या समस्या निर्माण झाल्या आहे. म्हणूनच प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये औद्योगिकीकरणामुळे पुणे जिल्ह्यातील आर्थिक आणि सामाजिक बदलांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

**साहित्य सर्वेक्षण (Review of Literature):**

औद्योगिकीकरण व सामाजिक-आर्थिक विकास या विषयावर अनेक अभ्यास झाले आहेत. त्यांचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे

1. दामोदर धोळे (१९९५) यांनी महाराष्ट्रातील औद्योगिकीकरणाच्या प्रवासाचा अभ्यास करताना पिंपरी-चिंचवड भागाचा उल्लेख महत्त्वाच्या औद्योगिक पट्ट्यांपैकी एक म्हणून केला आहे.

2. गाडगीळ व जोशी (२००३) यांनी पुणे जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीत शिक्षण व उद्योग यांच्या परस्परसंबंधाचे विश्लेषण केले.

3. पाटील (२०१०) यांच्या संशोधनानुसार औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले असून त्यामुळे शहरीकरण व सामाजिक विषमता वाढली आहे.

4. डॉ . विशाल गायकवाड (२०१३) पीएच .डी संशोधन अभ्यासामध्ये ओद्योगिकिकरणाचा सामाजिक व आर्थिक परिणाम बाबत अभ्यास केला आहे.

4. महाजन (२०१७) यांनी महिलांच्या रोजगारात झालेली वाढ व तिचा कौटुंबिक रचनेवर झालेला परिणाम यावर लक्ष केंद्रित केले.

5. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (NSSO) अहवाल विविध दशकांतील औद्योगिक व शहरी विकासाचे आकडेवारीसह चित्रण करतो, ज्यामुळे पुणे जिल्ह्याच्या बदलत्या अर्थव्यवस्थेचे आकलन करणे सोपे होते.

या सर्व साहित्याचा आढावा घेतल्यास दिसते की पुणे जिल्ह्याच्या औद्योगिकीकरणाने केवळ आर्थिक नाही तर सामाजिक क्षेत्रावरही खोलवर परिणाम केले आहेत.

**उद्दिष्टे (Objectives of Study):**

या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे -

1. औद्योगिकीकरणामुळे पुणे जिल्ह्यात घडून आलेल्या आर्थिक बदलांचा अभ्यास करणे.
2. सामाजिक संरचनेत व जीवनशैलीत झालेल्या बदलांचे विश्लेषण करणे.
3. औद्योगिकीकरणाचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम चिकित्सक दृष्टिकोनातून तपासणे.
4. शाश्वत औद्योगिक विकासासाठी काही शिफारसी मांडणे.

**पद्धतशास्त्र (Research Methodology):**

हा अभ्यास मुख्यत्वे द्वितीयक स्रोतांवर आधारित आहे.

द्वितीयक माहिती : सरकारी अहवाल, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे वार्षिक अहवाल, जनगणना आकडेवारी, संशोधन प्रबंध, जर्नल्स व पुस्तके.

विश्लेषण पद्धती : वर्णनात्मक (Descriptive) व चिकित्सक (Analytical) दृष्टिकोन.

पुणे जिल्ह्याच्या औद्योगिकरणामध्ये एमआयडीसीची भूमिक : औद्योगिक विकासामध्ये अनुक्रमे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते त्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यात झपाट्याने झालेल्या औद्योगीकरणांमध्ये औद्योगिक महामंडळाचे कार्य हे विशेष उल्लेखनीय ठरते.

2015 नंतर पुणे जिल्ह्यात औद्योगिक महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीची संख्या धारण क्षेत्र उद्योग संख्या खालील तक्त्यामध्ये दर्शनात आलेली आहे.

| अनु क्र. | एमआयडीसी वसाहत शेत्र | धारण क्षेत्र [हेक्टर मध्ये ] |
|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड | 1524.02 |
| २ | तळेगाव | 680.07 |
| ३ | चाकण | 457.30 |
| ४ | बारामती | 781.15 |
| ५ | जेजुरी | 345.70 |
| ६ | रांजणगाव | 910.17 |
| ७ | हिंजवडी | 112.00 |
| ८ | कुरकुंभ | 487.00 |
|  | एकूण | 5297.41 |

संदर्भ - Maharashtra Economic Survey 2022–23

वरील आकडेवारी विचारात घेता महाराष्ट्रातील MIDC क्षेत्रांमध्ये पुणे जिल्हा तील हिस्सा सर्वाधिक दाखवते. पुणे जिल्ह्यातील एमआयडीसी औद्योगिक वसाहती धारण क्षेत्राचे विश्लेषण केले आहे .

पुणे जिल्हा हा महाराष्ट्रातील एक प्रमुख औद्योगिक जिल्हा असून येथे एमआयडीसी अंतर्गत अनेक औद्योगिक वसाहती विकसित करण्यात आल्या आहेत. या वसाहतींचे धारण क्षेत्र (हेक्टरमध्ये) पाहिले असता जिल्ह्यातील औद्योगिक विस्ताराची स्पष्ट कल्पना येते. दिलेल्या माहितीनुसार पुणे जिल्ह्यातील ८ प्रमुख एमआयडीसी औद्योगिक वसाहतींचे एकूण धारण क्षेत्र ५२९७.४१ हेक्टर आहे. हे क्षेत्र जिल्ह्यातील औद्योगिक क्षमतेचे द्योतक आहे.

**क्षेत्रफळानुसार विश्लेषण:**

पिंपरी-चिंचवड एमआयडीसी हे १५२४.०२ हेक्टर क्षेत्रासह सर्वात मोठे औद्योगिक वसाहत क्षेत्र आहे. येथे मोठ्या प्रमाणावर ऑटोमोबाईल, अभियांत्रिकी व उत्पादन उद्योग विकसित झाले असून हे क्षेत्र पुणे जिल्ह्याचा औद्योगिक कणा मानले जाते.

रांजणगाव एमआयडीसीचे धारण क्षेत्र ९१०.१७ हेक्टर असून हे क्षेत्र मोठ्या आणि बहुराष्ट्रीय उद्योगांसाठी प्रसिद्ध आहे. निर्यातप्रधान उद्योग व मोठ्या उत्पादन प्रकल्पांमुळे या वसाहतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

बारामती एमआयडीसीचे क्षेत्र ७८१.१५ हेक्टर आहे. या भागात कृषीआधारित उद्योग, अन्नप्रक्रिया आणि मध्यम स्वरूपाचे उद्योग विकसित झालेले दिसतात, ज्यामुळे ग्रामीण-औद्योगिक समन्वय साधला गेला आहे.

तळेगाव एमआयडीसीचे धारण क्षेत्र ६८०.०७ हेक्टर असून हे क्षेत्र ऑटोमोबाईल व सहाय्यक उद्योगांसाठी महत्त्वाचे मानले जाते. मुंबई-पुणे दळणवळण मार्गावर असल्यामुळे येथे औद्योगिक वाढ जलद गतीने झाली आहे.

कुरकुंभ एमआयडीसीचे क्षेत्र ४८७.०० हेक्टर आहे. रासायनिक व खत उद्योगांसाठी हे क्षेत्र ओळखले जाते, त्यामुळे पुणे जिल्ह्यातील औद्योगिक विविधतेत भर पडली आहे.

चाकण एमआयडीसीचे धारण क्षेत्र ४५७.३० हेक्टर आहे. ऑटोमोबाईल उद्योगांचे केंद्र म्हणून चाकणचा विकास झाला असून रोजगारनिर्मितीत याचे योगदान महत्त्वाचे आहे.

जेजुरी एमआयडीसीचे क्षेत्र ३४५.७० हेक्टर आहे. येथे मध्यम व लघुउद्योगांचा विकास झालेला असून स्थानिक रोजगाराला चालना मिळाली आहे.

हिंजवडी एमआयडीसीचे क्षेत्र तुलनेने कमी म्हणजे ११२.०० हेक्टर असले तरी आयटी व आयटीईएस उद्योगांमुळे या क्षेत्राचे आर्थिक महत्त्व फार मोठे आहे. कमी क्षेत्रातही उच्च मूल्यनिर्मिती करणारा हा भाग आहे.

**पुणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमुळे झालेला आर्थिक विकासावरील परिणाम:**

**१. रोजगारनिर्मिती:**

औद्योगिक वसाहतींमुळे पुणे जिल्ह्यातील रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विविध कारखाने, कंपन्या आणि उद्योगांमुळे स्थानिक तसेच इतर जिल्ह्यांतील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या.

यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कमी झाले आणि लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली. रोजगार वाढल्यामुळे लोकांची क्रयशक्ती वाढून बाजारपेठेचा विस्तार झाला.

**२. गुंतवणुकीत वाढ:**

औद्योगिक विकासामुळे गुंतवणुकीत वाढ झाली आहे. देशी व परदेशी कंपन्यांनी पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवले आहे. यामुळे उत्पादन क्षमता वाढली तसेच निर्यातीत वाढ होऊन जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली. लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांच्या विकासामुळे औद्योगिक रचना अधिक मजबूत झाली आहे.

**३. पायाभूत सुविधांचा विकास:**

औद्योगिक वसाहतींमुळे पायाभूत सुविधांचा विकास झाला आहे. रस्ते, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, वाहतूक, गोदामे आणि दळणवळण व्यवस्था सुधारली आहे. या सुविधांचा लाभ उद्योगांबरोबरच स्थानिक नागरिकांनाही झाला आहे. त्यामुळे व्यापार आणि व्यवसायास अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे.

**४. शासनाच्या महसुलात वाढ:**

औद्योगिकीकरणामुळे शासनाच्या महसुलात वाढ झाली आहे. उद्योगांकडून मिळणारे कर, शुल्क व इतर उत्पन्नामुळे राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली. या उत्पन्नाचा वापर शिक्षण, आरोग्य, सामाजिक विकास आणि सार्वजनिक सुविधांसाठी करण्यात येतो.

**पुणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमुळे झालेला सामाजिक विकासावरील परिणाम:**

**१. लोकांचे जीवनमान सुधारले दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले:**

औद्योगिक वसाहतींमुळे स्थानिक तसेच स्थलांतरित कामगारांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती झाली आहे. कारखाने, आयटी कंपन्या, ऑटोमोबाईल उद्योग, औषधनिर्माण उद्योग यांमुळे युवकांना नोकऱ्या उपलब्ध झाल्या. परिणामी बेरोजगारी कमी झाली व लोकांचे उत्पन्न वाढले. वाढलेल्या उत्पन्नामुळे लोकांचे जीवनमान सुधारले आणि दारिद्र्याचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली.

**२. खेड्यांचे सामाजिक स्वरूप बदलले:**

औद्योगिकीकरणामुळे पुणे जिल्ह्यात वेगाने शहरीकरण झाले. रस्ते, वाहतूक, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, गृहनिर्माण सुविधा विकसित झाल्या. चाकण व तळेगाव रांजणगाव सणसवाडी कुरकुंभ भोसरी शिक्रापूर राजगुरुनगर बारामती इत्यादी परिसरा मध्ये आधुनिक नागरी सुविधा उपलब्ध झाल्या. ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढले, ज्यामुळे खेड्यांचे सामाजिक स्वरूप बदलले.

**३. आरोग्य व सामाजिक सुविधा:**

उद्योगांमुळे रुग्णालये, दवाखाने, आरोग्य केंद्रे विकसित झाली. अनेक उद्योगांनी आपल्या सामाजिक जबाबदारीतून (CSR) शाळा, आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहीम, पिण्याच्या पाण्याच्या योजना राबवल्या. त्यामुळे आरोग्य व स्वच्छतेविषयी जनजागृती वाढली.

**४. सामाजिक बदल व महिला सशक्तीकरण:**

औद्योगिक विकासामुळे समाजरचनेत बदल झाले. संयुक्त कुटुंबपद्धतीऐवजी विभक्त कुटुंबपद्धती वाढली. महिलांना उद्योग व सेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढले व त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला. औद्योगिकीकरणामुळे रोजगारनिर्मिती, शहरीकरण, उत्पन्नवाढ, शिक्षणाच्या संधी, महिलांचे सबलीकरण यांसारखे सकारात्मक बदल झाले, तर दुसरीकडे प्रदूषण, झोपडपट्ट्यांची वाढ, सामाजिक विषमता, पारंपरिक व्यवसायांचा ऱ्हास अशा नकारात्मक बाबीही पुढे आल्या. पुणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमुळे (MIDC, आयटी पार्क्स, ऑटोमोबाईल क्लस्टर इ.) आर्थिक व सामाजिक विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. हा विकास

समतोल व सर्वसमावेशक व्हावा यासाठी खालील महत्त्वपूर्ण शिफारसी मांडता येतील —

**१) आर्थिक विकासाबाबत शिफारसी:**

**१ स्थानिक रोजगाराला प्राधान्य:**

- औद्योगिक वसाहतींमध्ये स्थानिक तरुणांसाठी रोजगार बंधनकारक करणे.
- स्थानिक गरजांनुसार कौशल्य विकास केंद्रे (Skill Development Centres) स्थापन करणे.
- MSME व स्टार्टअप्सना चालना
- लघु, सूक्ष्म व मध्यम उद्योगांसाठी स्वस्त कर्ज, सबसिडी व सुलभ परवाने.
- स्थानिक उद्योजकांसाठी औद्योगिक क्लस्टर-आधारित सहाय्य.

**२ ग्रामीण-औद्योगिक समन्वय:**

- ग्रामीण भागातील कृषी-आधारित उद्योग (फूड प्रोसेसिंग, कोल्ड स्टोरेज) वाढवणे.
- शेतमालाला थेट उद्योगांशी जोडणारी साखळी (Value Chain).निर्माण करणे

**३ संतुलित औद्योगिकीकरण:**

पिंपरी-चिंचवड, चाकणपुरतेच उद्योग न ठेवता दौंड, इंदापूर, जुन्नर, भोरसारख्या मागास तालुक्यांत उद्योगांना प्रोत्साहन देणे.

**२) सामाजिक विकासाबाबत शिफारसी:**

**१ कामगार कल्याण योजना:**

- औद्योगिक कामगारांसाठी परवडणारी घरे, आरोग्य सुविधा व सुरक्षित वाहतूक.
- महिला कामगारांसाठी पाळणाघरे , सुरक्षित कार्यस्थळे.
- शिक्षण व आरोग्य पायाभूत सुविधा
- CSR अंतर्गत शाळा, आयटीआय, पॉलिटेक्निक व आरोग्य केंद्रे उभारणे.
- औद्योगिक वसाहतीजवळ सरकारी रुग्णालये बळकट करणे.

**२ स्थलांतरित लोकसंख्येचे समायोजन:**

- स्थलांतरित कामगारांसाठी निवास, पाणी, स्वच्छता व सामाजिक सुरक्षा.
- स्थानिक व स्थलांतरितांमध्ये सामाजिक सलोखा राखण्यासाठी उपक्रम राबविणे .

**३ समाजातील विषमता कमी करणे:**

दुर्बल घटकांसाठी (SC/ST, महिला, अपंग) विशेष रोजगार व प्रशिक्षण योजनाउपलब्ध करून देणे .

**३) पर्यावरणीय व शाश्वत विकासाबाबत शिफारसी:**

**१ पर्यावरण संरक्षण:**

- औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (CETP) प्रभावीपणे कार्यान्वित करणे.
- प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कठोर नियंत्रण ठेवणे .

**२ हरित औद्योगिक वसाहती** (Green Industrial Estates):

- सौरऊर्जा, पर्जन्यजल साठवण, वृक्षारोपण सक्तीचे करणे.
- कार्बन उत्सर्जन कमी करणाऱ्या तंत्रज्ञानाला प्रोत्साहनदेणे .

**३ वाहतूक व नागरी नियोजन:**

- औद्योगिक भागांमध्ये सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे.
- ट्रॅफिक, अपघात व प्रदूषण कमी करण्यासाठी स्वतंत्र लॉजिस्टिक मार्ग आखणे .

**४) प्रशासन व नियोजनाबाबत शिफारसी:**

**१ एकात्मिक औद्योगिक नियोजन:**

- जिल्हास्तरीय औद्योगिक विकास आराखडा (District Industrial Plan)तयार करणे .

- MIDC, स्थानिक स्वराज्य संस्था व उद्योग यांच्यात समन्वय साधने .

**२ डिजिटल व पारदर्शक प्रशासन:**

- उद्योग परवाने, तक्रारी, निरीक्षण यासाठी ऑनलाइन प्रणाली निर्माण करणे .
- भ्रष्टाचारमुक्त व वेगवान निर्णय प्रक्रिया राबविणे .

**निष्कर्ष :**

पुणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींनी आर्थिक वाढीस मोठे योगदान दिले असले तरी, सामाजिक समता, पर्यावरणीय संतुलन व प्रादेशिक समानता यांचा विचार करूनच पुढील औद्योगिक धोरण राबवणे आवश्यक आहे. वरील शिफारसी अंमलात आणल्यास पुणे जिल्ह्याचा विकास सतत, समावेशक व शाश्वत होईल

**संदर्भ :**

1. The Theory of Industrial Organization — Jean Tirole (MIT Press, प्रकाशित 1988)
   औद्योगिक संघटन व स्पर्धात्मक धोरण यांचा ताळमेळ सांगणारे एक अग्रगण्य शास्त्रीय पुस्तक.
2. Industrial Economics: Issues and Perspectives — Paul R. Ferguson & Glenys J. Ferguson (Red Globe Press / Palgrave, 1998)
   औद्योगिक अर्थशास्त्रातील प्रमुख विषयांचे समग्र विश्लेषण.
3. Industrial Economics: An Applied Approach — W. Stewart Howe (1978)
   औद्योगिक बाजार, संरचना–वर्तन–परिणाम यांचे व्यवहारात्मक विश्लेषण.
4. Industrial Economics: An Introductory Textbook — R. R. Barthwal (पहिली आवृत्ती 2007; औद्योगिक अर्थशास्त्राचे मूलभूत संकल्पना आणि सिद्धांत